# राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे

**महाराष्ट्र राज्य**

| | | |
|---|---|---|
| अतिरिक्त संचालक<br>दूरध्वनी क्रमांक (वै) -<br>कार्यालय दूरध्वनी क्र. - | २६०५८९९६ (वै)<br>२६०५८७३९ (का)<br>२६०५८१३९ (का)<br>२६०५८४७६ (का) | अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटूंब कल्याण, माताबाल संगोपन व शालेय आरोग्य, कुटूंब कल्याण भवन, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, औंध जिल्हा रुग्णालय परिसर, सांगवी फाटयाजवळ, औंध छावणी, औंध, पुणे- ४११०२७<br>**Email ID: ch.sfwb-pun@gov.** |
| **आरोग्य सेवा** | | जा.क्र.राकुकका/बाल आरोग्य- १५क/ **Implementation of STOP Diarrhoea Campaign 2025 /** /२०२५/24243-350 दि.28/०५/२०२५ |


प्रति

१) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद .........(सर्व)
२) जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय...... (सर्व)
३) वैद्यकिय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका .....(सर्व)
४) कार्यकारी आरोग्य अधिकारी, महानगरपालिका......... बृहन्मुंबई

विषय – राज्यात दि. ०२/०६/२०२५ ते ३१/०७/२०२५ या कालावधीत **STOP Diarrhoea Campaign 2025** राबविणेबाबत...

संदर्भ- सहसचिव, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र File No. **D.O. No. Z-28020/41/2018-CH, Dated 26/05/2025**

राज्यातील बालमृत्यू कमी करण्यासाठी राज्य शासनामार्फत विविध उपाययोजना व कार्यक्रम राबविण्यात येतात व याव्दारे बालमृत्यु कमी करण्यासाठी प्राधान्य देण्यात येते. देशात पाच वर्षाखालील मुलांमध्ये अंदाजे ४.८% मृत्यू हे अतिसारामुळे होत असून अतिसारामुळे होणारे बालमृत्यू कमी करणे हे सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेपुढील एक मोठे आव्हान आहे. याकरीता अतिसाराची लक्षणे वेळीच ओळखून योग्य व्यवस्थापनाव्दारे अतिसारामुळे होणारे मृत्यू लवकर रोखता येतात.

अतिसाराच्या घटनांमध्ये ओरल रिहायड्रेशन सोल्यूशन (ORS), झिंक सप्लिमेंटेशन आणि पोषणाकरीता योग्य पुरक पोषक आहार यांचा योग्य रित्या वेळीच वापर केल्यास अतिसारामुळे होणारे मृत्यु लक्षणीयरीत्या कमी होऊ शकतात आणि बालकांचे आरोग्य सुधारू शकते. या समस्येचे प्रभावीपणे निराकरण करण्यासाठी केंद्र शासनाच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने **STOP Diarrhea Campaign** सुरु केले असून सदर मोहिम राज्यात राबविणेबाबत संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. या मोहिमचे घोषवाक्य खालील प्रमाणे आहे.

**Diarrhoea ki Roktham, Safai aur ORS se rakhen apna dhyaan**

## अतिसारावर करा मात,स्वच्छता आणि ओआरएस ची घेऊनी साथ

सदर **STOP Diarrhea Campaign 2025** मोहिम राज्यात दोन टप्प्यांमध्ये राबवावयाची आहे.

टप्पा १ — मोहिमेची पुर्वतयारीः दि. २ ते १५ जून २०२५-- यामध्ये मोहिमेचे नियोजन (Planning), राज्य शासनाच्या विविध विभागांमध्ये समन्वय आणि मोहिमेकरीता कर्मचा-यांचे प्रशिक्षण या प्रमुख बाबी आहेत. त्याचप्रमाणे जिल्हा व तालुका कृती दलाची स्थापना करणे, मोहिमेकरीता आवश्यक IEC आराखडा निश्चित करणे आणि ORS आणि झिंक गोळयांचा पुरेसा साठा वितरणासाठी उपलब्ध आहे हे सुनिश्चित करणे या अन्य बाबींचा समावेश होतो.

टप्पा २ — मोहिमेची अंमलबजावणी दि. १६ जून २०२५ ते ३१ जूलै २०२५

यामध्ये निव्वळ स्तनपानास प्रोत्साहन, रोटाव्हायरस लसीकरण, हातांची स्वच्छता, सुरक्षित पाण्याची व्यवस्था, ओआरएस आणि झिंकचे वितरण, सर्व आरोग्य संस्था आणि अंगणवाड्यांमध्ये ओआरएस-झिंक कॉर्नरची स्थापना, अतिसारावर उपचार इ. बाबींचा समावेश आहे.

तरी आपणास सुचित करण्यात येते की, STOP Diarrhea Campaign २०२५ मोहिमेच्या यशासाठी आणि अतिसारामुळे टाळता येण्या-या मृत्यूंना प्रतिबंध करण्यासाठी सर्व संबंधित विभागांचे सक्रिय सहकार्य सुनिश्चित करावे व सदर माहिमेची आपल्या जिल्हयात यशस्वी अंमलबजावणी होईल याकडे जातीने लक्ष दयावे. तसेच उपरोक्त दिलेल्या सुचनांनुसार दि. २ जून ते १५ जून २०२५ या कालावधी मध्ये मोहिमेची पूर्वतयारी (Preparatory Phase) व दि.१६ जून २०२५ ते ३१ जूलै २०२५ या कालावधीत मोहिमेची अंमलबजावणी (Implementation Phase) याप्रमाणे STOP Diarrhoea Campaign २०२५ राबविण्यात यावे.

या मोहिमेबाबतच्या सविस्तर मार्गदर्शक सुचना, जिल्हा / महानगरपालिका व प्रा.आ केंद स्तरावरील नियोजनाचा नमुना व मोहिमेच्या अहवालाची गुगल शीट लिंक सोबत पाठविण्यात येत आहे. तरी सदर मोहिम यशस्वीरीत्या राबवून मोहिमेचा एकत्रित स्वाक्षरीत अहवाल दि. ०८/०८/२०२५ पर्यंत या कार्यालयास **ch.sfwb-pun@gov.in या ई-मेल आयडीवर सादर करावा.**

( डॉ. संदीप सांगळे )
अतिरिक्त संचालक आरोग्य सेवा
राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे

प्रत माहिती व आवश्यक पाठपुराव्यास्तव -
उपसंचालक, आरोग्य सेवा परीमंडळे..... सर्व
२/- आपल्या मंडळातील जिल्हयांमध्ये उपरोक्त सूचनांनुसार STOP Diarrhoea Campaign २०२५ या मोहिमेची अंमलबजावणी होण्यासाठी पाठपुरावा करावा.

प्रत सविनय सादर-
१. मा. सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
२. मा. आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य भवन, मुंबई
३. मा. संचालक, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई
४. मा. संचालक, आरोग्य सेवा, पुणे